कृषि विभाग जिल्हा परिषद, रत्नागिरी.
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
माळनाका रत्नागिरी ४१५ ६१२.

दूरध्वनी क्र.- ०२३५२-२२४६२७ ई मेल - adortn296@gmail.com / adortn@rediffmail.com

क्र. रजिप/कृषी/ सॉ २/ १८२६ /२०२१ दिनांक ०२.०९.२०२१

प्रति,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद रत्नागिरी.

विषय :- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२० -२१.**
योजनेची विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रचार व प्रसिध्दी करणेबाबत.....

संदर्भ :- १) मा. कृषी संचालक (वि व प्र), कृषी आयुक्तालय यांचे पत्र क्र. विप्र७/ डॉ.बाआंकृस्वायो/ मासू/२०२०-२१/२५१६६/२०२१ दि. ०५.०८.२०२१.
२) मा. विभागीय कृषी सह संचालक, कोकण विभाग, ठाणे यांचे पत्र क्र. विकृससं/ स्वावलंबनयो/कृषी ३/ /२०२० दिनांक १७.०८.२०२१.

उपरोक्त संदर्भ क्र. ०१ अन्वये, सन २०२१ - २२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेची अंमलबजावणी करणेसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार या योजनेचा लाभ घेणेसाठी इच्छुक अर्जदारांना अर्ज करणेची सुविधा महाडीबीटी पोर्टलच्या www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहे. याबाबत विविध प्रसार माध्यमांद्वारे व्यापक प्रचार व प्रसिध्दी करणेत यावी अशा सूचना उपरोक्त संदर्भ क्र. ०२ अन्वये देणेत आल्या आहेत.

त्यानुषंगाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना २०२१ –२२ बाबत यासोबत जोडलेले प्रसिध्दी पत्रक, जिल्हा परिषद रत्नागिरीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी विनंती आहे.

कृषी विकास अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

Scanned with Ca

कृषी विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२१- २२**

प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावणे व त्यांना स्वयंपूर्ण करणे यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२१ –२२ राबविणेत येत आहे. या योजनेंतर्गत शेतक-यांना " नवीन विहीर / जुनी विहीर दुरुस्ती / इनवेल बोअरिंग / वीज जोडणी आकार / पंप संच / शेततळयांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण / सूक्ष्म सिंचन संच " या बाबींसाठी अर्थसहाय्य देणेत येते. या योजनेसाठी खालील निकष आहेत.

१) अर्जदार हा अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकरी असावा.

२) सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र अर्जदाराने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

३) ज्या शेतक-यांना नवीन विहीर या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्याकडे किमान ०.४० हे. शेतजमीन असणे आवश्यक आहे.

४) सामूहिक शेतजमीन किमान ०.४० हे. धारण करणारे एकत्रित कुटुंब नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणेसाठी पात्र असेल.

५) शेतक-याच्या नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फूटांच्या अंतरामध्ये दुसरी विहीर नसावी.

६) ज्या शेतक-यांना नवीन विहीर व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्याकडे किमान ०.२० हे. शेतजमीन असणे आवश्यक आहे.

७) सदर योजनेंतर्गत कमाल शेतजमीनीची अट ०६.०० हे. आहे.

८) अर्जदाराच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा (नगरपंचायत, नगर पालिका क्षेत्राबाहेरील) असावा.

९) अर्जदाराकडे आधारकार्ड व आधारकार्डाशी संलग्न बॅंक खाते असणे आवश्यक आहे.

९) स्व. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमान योजनेंतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतक-यांना या योजनेचा प्राधान्याने लाभ देणेत येईल.

१०) अ. जा. / नवबौध्द शेतक-याचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- पेक्षा जास्त नसावे.

११) अर्जदारास योजनेंतर्गत लाभ देणेसाठी ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

१२) या योजनेंतर्गत, नवीन विहीर - २५००००/-, जुनी विहीर दुरुस्ती - ५००००/-, इनवेल बोअरिंग - रु. २००००/-, पंपसंच - रु. २००००/-, वीज जोडणी आकार - रु. १००००/-, शेततळयांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण - रु. १०००००/-, ठिबक सिंचन संच - रु. ५००००/-, तुषार सिंचन रु. २५०००/- या मर्यादेत अनुदान देणेत येते.

१३) या योजनेंतर्गत अर्ज करणेची सुविधा www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. इच्छुक शेतक-यांनी आवश्यक कागदपत्रे या संकेतस्थळावर अपलोड केलेनंतर त्यांची प्रिंट काढून त्यांचे तालुक्यातील पंचायत समितीच्या कृषी विभागात सादर करावी.

कृषी विकास अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी